# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/11/2023 (बुधवार) सकाळ

---

### दुकानाचे शटर फोडणारी टोळी उमरेड पोलीसाचे ताब्यात

पोलीस स्टेशन उमरेड येथे दिनांक १८/११/२०२३ रोजीच्या मध्यरात्री मार्केट परिसर व इतर ठिकाणी मोसानी येवुन एकुण ०८ दुकानाचे शटर तोडुन दुकानातील मुद्देमाल व नगदी रक्कम चोरुन नेली होती. सदर प्रकरणात पोस्टेला अप ६६७/२३ कलम 457, 380, 511,427,34 भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मार्केट परिसरामध्ये चोरी झाल्यानंतर व्यापाराचे मनामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. सदर घटनेच्या ठिकाणावरील सी. सी.टी.व्ही फुटेज गोळा करून घटनेच्या दिवसापासुन उमरेड पोलीसाचे एक पथक नागपुर शहर येथे पोलीस खबरी व लोकांना दाखवुन बातमीदाराकडुन गुप्त माहीती घेवुन समजले की, आरोपी हे नागपुर शहर येथील असल्याची दाट शक्यता आहे. त्याचेवरून उमरेड पोलीसाचे तपास पथक हे नागपुर मध्ये ठाण मांडुन सदरच्या आरोपीमध्ये एक आरोपीची ओळख पटली. ओळख पटलेल्या आरोपीची गुप्त बातमीदाराच्या मदतीने त्याला ताब्यात घेवुन त्याला कसोटीने विचारपुस केली असता त्याने उमरेड येथे गुन्हा केल्याचे कबुल केल्यानंतर त्याने चोरी करतेवेळी माझेसोबत आणखी ०९ आरोपी असल्याचे सांगितले. उर्वरित ०९ आरोपीतांना पकडण्याचे पोलीसासमोर एक मोठे आव्हान होते. तरी उमरेड पोलीसांनी आपले चातुर्य दाखवुन ०९ आरोपीपैकी ०८ आरोपीना उमरेड पोलीसांनी ताब्यात घेवुन विचारपुस दरम्यान त्यांनी पोस्टे उमरेड येथे केलेल्या गुन्हयाची कबुली दिली. विचारपुस दम्यान आणखी त्यांना नागपुर ग्रामीण हददीत गुन्हे केल्याची कबुली दिली व बाहेर जिल्हयातील काही गुन्हें उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदर आरोपीतांवर याअगोदर सुदधा अशाच प्रकारचे गुन्हे दाखल असुन आरोपी सराईत गुन्हे करण्याची प्रवृतीचे आहेत. अटक आरोपीतांचे नावे पुढीलप्रमाणे आहेत. १) जितेंद्र उर्फ बिट्टु खन्ना तुळशीराम बिसेन वय २१ वर्षे. २) अंकित उर्फ सरकार सुरेश पाटील वय २० वर्षे. ३) हिमांशु प्रविण यादव वय २१ वर्षे. 4) राहुल विजय सोलंकी वय १९ वर्षे. ५) अथर्व अनिल वाटकर वय १९ वर्षे 6) अपूर्व उर्फ अया विजय कांबळे वय २३ वर्षे सर्व रा नागपूर व इतर ०३ विधीसंघर्षग्रस्त बालक रा नागपुर – अटक करण्यात आलेल्या आरोपीतांकडुन गुन्हयात वापरलेल्या एकुण ०५ स्पोर्ट बाईक, ०४ ॲडाईड मोबाईल व नगदी ३८३२००/–रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयातील तपासात इतर मुददेमाल जप्त करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधिक्षक श्री. संदिप पखाले सा, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड नागपुर विभाग, याचं मार्गदर्शनाखाली पोनी श्री. प्रमोद घोंगे सोबत पोउपनि दिनेश खोटेले पोहवा प्रदिप चवरे, राधेश्याम कांबळे, विष्णु जायभाये पोना पंकज बटटे पोशि संदिप गुटटे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर